# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक ३१० वा बुधवार दि.२२ मे २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी शाळापूर्व तयारी अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न व्हावेत -जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे





लातूर : - इयत्ता पहिलीतील प्रवेश हा प्रत्येक बालकाच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा असतो. येथूनच खऱ्या अर्थाने औपचारिक शिक्षणाला सुरुवात होते. त्यामुळे या बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी शाळापूर्व तयारी अभियानाच्या माध्यमातून शिक्षकांची योग्य प्रकारे क्षमता बांधणी व्हावी, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले. बालशिक्षण व मानवशास्त्र, एससीईआरटी, पुणे द्वारा आयोजित स्टार्स प्रकल्प अंतर्गत लातूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (डायट) वतीने लातूर येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालय येथे आयोजित शाळापूर्व तयारी अभियान विभागस्तरीय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या.

लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, लातूर डायटच्या प्राचार्य डॉ. भागीरथी गिरी, नांदेड डायटचे प्राचार्य डॉ. सुदर्शन चुटकुलवार, धाराशिव डायटचे प्राचार्य दयानंद जटमुरे, लातूर जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, नांदेडच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, लातूरच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नांदेडच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्यासह लातूर, धाराशिव, नांदेड येथील शिक्षक, पालक विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. इयत्ता पहिलीपासूनच शिक्षणाची गोडी निर्माण झाली, तर विद्यार्थ्याचे आयुष्य घडते. त्यामुळे पहिलीमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पाया घडविण्याची आणि आयुष्याला दिशा देण्याची जबाबदारी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. लातूर जिल्ह्यात शिक्षकांनी लोकसभा निवडणुकीत अतिशय चांगली कामगिरी केली, त्यामुळे मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. आता जिल्हा प्रशासनाने हाती घेतलेल्या वृक्ष लागवड मोहिमेतही शिक्षक, शाळांनी सक्रीय सहभाग नोंदवावा. शाळेत प्रवेश घेणाऱ्या 'विद्यार्थ्यांचे पहिले पाऊल, वृक्ष लावून' हा उपक्रम राबवून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नावे शाळेमध्ये एक झाड लावावे. तसेच विद्यार्थ्यांचा वाढदिवसादिवशी झाडाचाही वाढ दिवस साजरा करावा, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

ग्रामीण भागातील इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शाळापूर्व तयारी अभियान उपयुक्त ठरेल. हे अभियान इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित होणाऱ्या बालकांसाठी असल्याने यामध्ये शिक्षण विभागासोबतच एकात्मिक बाल विकास प्रकल्प, आरोग्य विभाग यांनीही सहभाग देणे आवश्यक आहे, असे लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. तसेच लातूर जिल्ह्यात ८६० अंगणवाडीमध्ये 'वन स्टॉप सेंटर'च्या माध्यमातून महिला व मुलांना समुपदेशन, लसीकरण यासह विविध सुविधा देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यात 'आकार' आणि 'आरंभ' मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे ते म्हणाले.

शाळापूर्व तयारी अभियान यशस्वी होण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्नांची आणि शिक्षक, पालक यांची भूमिका महत्वाची आहे. एकही मुल शिक्षणापासून वंचित राहू नये, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच शिक्षकांना याबाबत योग्य प्रकारे प्रशिक्षित करणे आवश्यक असल्याचे धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सांगितले. शाळापूर्व तयारीसाठी हा विभागस्तरावरील पहिलाच मेळावा असून या अभियानामुळे कोणता विद्यार्थी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित होणार असल्याचे लक्षात येवून त्याचा प्रवेश जलदगतीने होण्यास मदत होते. पहिलीमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत भाषिक आणि गणितीय कौशल्य शिकविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यादृष्टीने प्रयत्न केले जात असल्याचे शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यावेळी म्हणाले.

प्रारंभी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर व डॉ. मैनाक घोष यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक स्वरुपात स्वागत करण्यात आले. तसेच मेळाव्याच्या निमित्ताने उभारण्यात आलेल्या विविध दालनांची मान्यवरांनी पाहणी केली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने तयार करण्यात आलेल्या 'गाथा यशाची : समावेशनाकडून शिक्षणाकडे...' या पुस्तकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य डॉ. भागीरथी गिरी यांनी केले, सतीश भापकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## २३ मे रोजी नेरूळ येथील रामलिला मैदानावर भव्यदिव्य बुद्ध जयंती महोत्सवाचे आयोजन..!



भदन्त : विमलकित्ती गुणसिरी. नवी मुंबई / के. एच. हनवते :- अखिल नवी मुंबई नागरी बुद्ध जयंती महोत्सव आयोजन समितीच्या सन्माननिय सदस्यांची बुध्द पोर्णिमा जयंती महोत्सव नियोजनाची महत्वाची मिटींग अनेक मान्यवरांच्या उपस्थितिमध्ये पार पडली. या मिटींग ला संपूर्ण नवी मुंबईतील घणसोली, सानपाडा, ऐरोली, दिघा, जुईनगर, नेरुळ, सीवुडस, उलवे, बेलापूर, खारघर, पनवेल, कामोटे, कळंबोली इत्यादींवर अशा नवी मुंबईतील अनेक ठिकाणाहून हजारोंच्या संख्येत बौद्ध उपासक - उपासिका व मानवतावादी विचारांची इतर लोक उपस्थित रहाणार आहेत तरी सर्वांनी दिनांक: २३ मे २०२४ रोजी सायंकाळी ठिक ५ ते १० या वेळेत रामलिला मैदान नेरूळ नवी मुंबई येथे हजारोंच्या संख्येत उपस्थित राहून आदरणीय बौद्ध धम्म गुरू यांच्या धम्म देसनेचा सर्वांनी लाभ घ्यावा व बौद्ध धम्म गतिमान करावा आसे आयोजकांच्या वतीने सर्वांना विनंती करण्यात येत आहे.

## जी.डी.सी.अँड ए परीक्षेला २४ मेपासून प्रारंभ

लातूर :- सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या कार्यालयामार्फत २४,२५ व २६ मे, २०२४ रोजी जी.डी.सी.अँड ए परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. लातूर शहरातील सिग्नल कॅम्प शासकीय रूग्णालयासमोरील श्री मारवाडी राजस्थान विद्यालय येथे ही परीक्षा होईल. ज्या विद्यार्थ्यांना परीक्षेचे हॉल तिकीट मिळालेले नाही अथवा मोबाईलद्वारे संदेश प्राप्त झालेले नाही, अशा विद्यार्थ्यांनी पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र, ड्रायव्हिंग लायसन्स व अनुषंगिक फोटो ओळखपत्रासह जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, प्रशासकीय इमारत, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, लातूर येथे किंवा ०२३८२-२४५१९३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा अथवा परीक्षेच्या दोन तास अगोदर परीक्षा केंद्रावर संपर्क साधावा, असे आवाहन लातूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था तथा चीफ कंडक्टर, जी.डी.सी.अँड ए परीक्षा यांनी केले आहे.

## ट्रक-बस ड्रायव्हरला जी शिक्षा ती पोर्श चालवणा-या मुलाला का नाही?




मुंबई : पुण्यातील भरधाव कार दुर्घटनेप्रकरणी दोघांचा जीव गेल्यानंतर आता त्यावर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीदेखील प्रतिक्रिया देत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. नरेंद्र मोदी हे दोन भारत निर्माण करत आहेत, ज्या ठिकाणी न्याय ही गोष्टदेखील श्रीमंतांची गुलाम झाली आहे असा सणसणीत आरोप राहुल गांधींनी केला. ट्रक ड्रायव्हर किंवा इतरांना जो न्याय दिला जातो तोच न्याय या पुण्यातील धनाड्याच्या मुलाला का दिला गेला नाही असा सवालही त्यांनी विचारला आहे.बस ड्रायव्हर, ट्रक ड्रायव्हर , ओला, उबेर ड्रायव्हर, ऑटो ड्रायव्हर यांच्याकडून जर काही चूक झाली आणि अपघातात कुणाचा चुकून मृत्यू झालाच तर त्यांना दहा वर्षांची शिक्षा ठोठावली जाते. त्याचसोबत त्यांच्याकडून चावी घेऊन ती फेकली जाते. पण जर श्रीमंत घरातील १६-१७ वर्षांचा मुलगा जर दारू पिऊन दोन लोकांची हत्या करतो, तर त्याला सांगितले जाते की अपघातावर निबंध लिहा, असे करा, तसे करा.त्या श्रीमंत मुलाला ज्या पद्धतीने शिक्षा म्हणून निबंध लिहायला लावला जातोय, तशा पद्धतीने त्या बस ड्रायव्हर, ट्रक ड्रायव्हरकडून का लिहून घेतले जात नाही. दोन भारत बनले आहेत, एक श्रीमंतांचा आणि एक गरिबांचा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींना विचारल्यानंतर ते म्हणतात की, मी सर्वांनाच गरीब बनवू का? पण प्रश्न हा नाही, प्रश्न आहे तो न्यायाचा. गरिबाला एक न्याय आणि श्रीमंतांना एक न्याय असे का? न्याय हा सर्वांनाच सारखा मिळाला पाहिजे. मग तो गरीब असो वा श्रीमंत.

## बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात नवनिर्वाचित व्यवस्थापक मंडळाचा सत्कार





लातुरः- काही दिवसापूर्वीच महात्मा बस्वेश्वर शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळाच्या निवडणुका झाल्या व त्यामध्ये निवडून आलेल्या व नियुक्त झालेल्या अध्यक्ष, उपाध्याक्ष व संचालक मंडळाने एम.एस.बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयास भेट दिली. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे, उपाध्याक्ष श्री. माधवराव पाटील, संचालक ॲड. काशीनाथ साखरे, श्री बस्वराज येरटे व श्री. गुरूलिंग धाराशिवे यांचा, महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. बस्वराज धरणे व इतर कर्मचाऱ्यांतर्फे सत्कार करण्यात आला. या प्रसंगी अध्यक्ष श्री. सांगवे साहेब यांनी महाविद्यालयाच्या कामकाजाचा पूर्ण आढावा घेतला तसेच त्यांनी महाविद्यालयाच्या प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. १०वी-१२वी प्रमाणेच अभियांत्रिकी शिक्षणात बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयाने लातुर पॅटर्न निर्माण करावा असे सर्व उपस्थितांना आवाहन केल. यानंतर झालेल्या चर्चासत्रात उपस्थितांना प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना उत्स्फुर्त सहभाग नोंदवत व्यवस्थापकीय मंडळातील सदस्यांशी हितगूज साधले. कार्यक्रमात शेवटी मा. अध्यक्ष, मा. उपाध्याक्ष व उपस्थित संचालक सदस्यांनी महाविद्यालयाच्या कामकाजाबद्ल समाधान व्यक्त केले. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक व कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## संगणक क्रांतीचे जनक,माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीव गांधी यांना मांजरा कारखाना येथे आदरांजली.



विलासनगर :-- विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना येथे भारत देशाच्या आधुनिक विकासाची मुहूर्त मेढ रोवणारे व त्यातून देशात संगणक क्रांती घडवून आणणारे माजी पंतप्रधान भारतरत्न स्व. राजीवजी गांधी यांना त्यांच्या जयंती निमित्ताने कारखाना स्थळी असलेल्या अर्धाकृती पुतळ्यास अभिवादन करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी अभिवादन करताना विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक श्री पंडित देसाई, चिफ अकौटंट श्री शरद सांळुखे, डिस्टलरी ईचार्ज श्री वाय. एस. देशमुख, ऊस पुरवठा अधिकारी श्री पी.एस.शेळके, परचेस ऑफिसर श्री एस.बी.गोसावी, कार्यलक्षी संचालक श्रीनिवास देशमुख ,एस एस देशमुख आदींची उपस्थिती होती.

## संपादकीय....

# हुशार मतदार

निवडणुकांचे निकाल जे काही येतील ते येणारच आहेत. चार जून रोजी संध्याकाळपर्यंत सगळे चित्र स्पष्ट झालेले असेल. राजकारणाचा एक भाग म्हणून आतापर्यंत झालेल्या निवडणुकांमध्ये आम्ही बहुमताचा आकडा पार केला आहे, असा दावा बिहारचे माजी उपमुख्यमंत्री आणि चारा घोटाळाफेम लालूप्रसाद यादव यांचे चिरंजीव तेजस्वी यादव यांनी केला आहे. हे दावे आणि प्रतिदावे उरलेल्या निवडणुकांवरती प्रभाव टाकण्यासाठी असतात. याचा अर्थ मॅच सुरू होण्यापूर्वीच व्हाईस कॅप्टनने आम्ही मॅच जिंकल्यात जमा आहे, असे जाहीर करण्यासारखे आहे. ज्यांचे अद्याप मतदान व्हायचे राहिले आहे, त्यांच्या मनोभूमिकेत बदल करण्याचा प्रयत्न सगळेच राजकीय पक्ष करत असतात. भारतातील जनता एवढी साधी भोळी राहिलेली नाही हे मात्र अनेक वेळा निदर्शनास आले आहे.

तुम्हाला असे वाटेल की, भारतीय जनतेच्या बुद्धिमत्तेबद्दल आम्हाला इतका विश्वास कसा काय? जनतेच्या प्रगल्भतेवर विश्वास निर्माण करणार्या अनेक घटना इतिहासात घडलेल्या आहेत. १९७५ या वर्षी लागू झालेली आणीबाणी १९ महिन्यांनंतर इंदिरा गांधींनी उठवली. त्या काळामध्ये कुठलाही सोशल मीडिया उपलब्ध नव्हता. कुठलाही प्रचार न होता जनतेने काँग्रेसचा प्रचंड मोठा पराभव केला आणि इंदिरा गांधींना घरी बसवले. अडीच वर्षांचा जनता पक्षाचा काळ जनतेने पाहिला. आपापसातील हेव्यादाव्यांमुळे ते सरकार कोसळल्यानंतर पुन्हा जेव्हा निवडणुका झाल्या, तेव्हा इंदिरा गांधींचा राग आलेल्या जनतेने अवघ्या अडीच वर्षांत पुन्हा त्यांना सत्तेवर आणले. त्याही काळात कुठलाही सोशल मीडिया सक्रिय नव्हता. ज्या काय बातम्या कळायच्या, त्या रेडिओवर आणि वर्तमानपत्रांमधूनच. या दोन ऐतिहासिक घटनांनी देशातील जनता किती प्रगल्भ आहे, हे सिद्ध केले होते.

सर्वसामान्य भारतीय जनतेच्या आकलन शक्तीबद्दल तुमच्या मनात काही शंका असेल, तर काढून टाका. मोलमजुरी करणार्यापासून करोडपतीपर्यंत सर्व जनता बुद्धिमान आहे आणि ती योग्य निर्णय घेत असते, याविषयी आमच्या मनात काहीही शंका नाही. भ-ष्टाचाराचे आरोप सिद्ध झालेले लालूप्रसाद यादव सध्या शिक्षा भोगत असून, प्रकृतीच्या कारणास्तव जामिनावर आहेत. अशा वयोवृद्ध नेत्याला पण राजकारणात उतरून सर्व पक्षांना मात देण्याची खुमखुमी आहे. याला खुमखुमी म्हणायचे की अन्य काही, याचा निर्णय मात्र जनता नक्की घेत असते.

या निवडणुकीमध्ये मायावती अजिबात सक्रिय नाहीत. मायावती का गप्प आहेत, याविषयी तुमच्या मनात काही संशय असणे सहज शक्य आहे. बसपने या निवडणुकीतही उमेदवार उतरवले आहेत; परंतु स्वतः मायावती उत्तर प्रदेशातही फारशा प्रचाराला जात नाहीत. याचे कारण म्हणजे काचेच्या घरात राहणार्यांनी दुसर्यांवर दगड फेकणे चुकीचे असते, हे त्यांच्या लक्षात आले आहे. भ-ष्टाचाराच्या मार्गाने करोडो रुपयांची संपत्ती गोळा केल्यानंतर आपण जर राजकारणात सक्रिय झालो, तर किती महिने जेलमध्ये जावे लागेल, हे काही सांगता येत नाही. जेलची हवा कोणालाही नको असते. त्यापेक्षा शांत बसलेले बरे, असा विचार त्यांनी केलेला आहे.

# राजकीय संस्कृती जपणे निवडणूक जिंकण्याएवढेच महत्त्वाचे!

२०२४ हे निवडणुकांचे वर्ष म्हणून घोषित करण्यास आता काही हरकत नसावी, कारण तब्बल दोन वर्षांपासून 'रखडवलेल्या' महानगरपालिकांच्या निवडणुका ज्यामध्ये पुण्यासारख्या स्मार्टसिटी म्हणवल्या जाणाऱ्या शहरांचाही समावेश होतो, त्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकांच्या प्रभावाखाली (?) यावर्षीच घेण्यात येतील असा कयास राजकीय जाणकारांकडून वर्तविला जात आहे. बाकी निवडणुकांच्या स्वरूपाविषयी बोलायचे, तर ना उमदेवार विचारसरणीला धरून आहेत ना मतदार!

सर्वसामान्य माणसांच्या नजरेतून २०२४ च्या निवडणुका म्हणजे राजकारणातील नैतिकता, नितिमत्ता आणि विचारधारा धाब्यावर बसवण्याचा परमोच्च कळस म्हणावा लागेल. गेल्या काही वर्षांत राजकारण, राजकारणी, शासन, सरकारी यंत्रणा, शासकीय आयोग जितके बदनाम झाले, तेवढे आजवर कधीही झाले नव्हते! उमेवार पळवा-पळवी, पक्षांतर, सत्तेचा गैरवापर या गोष्टी याआधीही होत होत्या, नाही असं नाही! पण या सर्व अनुचित पद्धतींना मुख्य प्रवाहामध्ये आणून त्याला एक नैतिक अधिष्ठान देण्याचा केविलवाणा प्रयत्न गेल्या काही काळात केला गेल्याचे दिसते. आतापर्यंत जे अवैध प्रकार दबकत दबकत सुरू होते, ते आता राजरोसपणे कायद्याच्या संविधानाच्या आणि विधिमंडळाच्या चौकटीत होऊ लागले आहे. जेव्हा राजकीय नेते उघड- उघड रेटून खोटं बोलतात, तेव्हा सर्वसामान्य माणसालाही कळून चुकतं की माझं ते माझं आणि तुझं तेही माझंच, या धर्तीवर महाराष्ट्रात एकामेकांना ओरबाडण्याची स्पर्धा सुरू आहे. कुठेतरी महाराष्ट्राच्या आजवरच्या ५०-६० वर्षांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वाटचालीला गालबोट लागत आहे!

महाराष्ट्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासाला कुठल्याही मराठी माणसाचा विरोध असण्याचे काहीच कारण नाही. काहीही केले, तरीही लोक तर आपल्याला निवडून देणारच आहेत ही मनोवृत्ती वजा माज आता मतदारांच्या डोळ्यांत खुपू लागला आहे, हे मात्र जाणवते! मतदारांना शंभर टक्के गृहित धरण्याची मानसिकता आणि कमरेचे सोडून डोक्याला गुंडाळण्याची वृत्ती घातक ठरत आहे. आपली अवैध कृत्ये वैधानिक चौकटीत बसविल्याच्या दुराभिमानामुळे कदाचित राजकीय पक्षांचा तात्पुरता फायदाही होईल परंतु याचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राला भोगावे लागतील. कारण चोरी आणि चोरांना राजमान्यता देण्याचा प्रकार महाराष्ट्रात आजवर कधीच घडला नव्हता.

ज्या कुठल्या उमेदवाराला, राजकीय नेत्यांना किंवा पक्षांना संविधानाबद्दल मनापासून आत्मियता वाटते त्यांनी पहिल्या शंभर दिवसांमध्ये पक्षांतर बंदी कायद्यामधील सर्व पळवाटा, त्रुटी बाजूला करून राजकीय नेते आणि पक्षांवर जबरदस्त वचक ठेवणे अत्यंत निकडीचे आहे. एखाद्या राजकीय पक्षाच्या नेत्यांमध्ये अंतर्गत मतभेद यापूर्वी कधी नव्हतेच असे नाही. एकमेकांच्या भूमिका न पटण्याची बरीचशी उदाहरणे इतिहासात आहेतच, पण म्हणून किंवा स्वत:ची मोठी रेघ ओढता येत नाही म्हणून इतरांच्या रेषा पुसट करण्याचे पायंडे कधी इथे इतक्या उघडपणे पडल्याचे ऐकिवात नव्हते! हे सारे ज्या सुजाण डोळस नागरिकांच्या लक्षात येते त्यांचे आता एकच म्हणणे दिसते, म्हातारी मेली तरी चालेल काळ सोकावता कामा नये, पण कदाचित आता काळही सोकावतो आहे की काय, अशी शंका येऊ लागते.एक-दोन दशकांपूर्वी लोकांना एकमेकांच्या जातीचा काही प्रमाणात विसर पडला होता एखाद्याने जात विचारली, तर त्याला मागास समजले जात असे. पण आज जातीवरून गट-तट एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. अगदी गावकीमध्ये आणि समाजमाध्यमांमध्येसुद्धा! महाराष्ट्रातील वातावरण जर खासगीकरण, शासकीय यंत्रणाच्या स्वायतत्ता, रोजगार या भीषण प्रश्नांपेक्षा जाती धर्माच्या विषयांवर गढूळ होत असेल तर ही धोक्याची घंटा मानावी लागेल!

मतदार आणि कार्यकर्त्यांमध्ये कोंबड्यांच्या झुंजीप्रमाणे वाद पेटवून देऊन महत्वाचे मुद्दे बाजूला सारण्यात राजकीय नेते यशस्वी होत असतील तर असे राजकारणी बाजूला सारण्याची किंवा कानठळ्या बसविणारा डीजेचा आवाज असेल, कुठेही शासकीय अंकुश असल्याचे दिसत नाही.

पक्षीय फोडफोडी, निविदा टक्केवारी आणि निवडणूक जागावाटप यापलीकडे जाऊन राजकारण आहे आणि आपण जनतेला उत्तर देण्यास बांधिल आहोत याची जाणीव काही राजकीय नेत्यांमध्येच शिल्लक दिसते. रस्ते, उड्डाणपूल, महामार्ग बांधले म्हणजेच फक्त विकास हा फंडा तर सुमार दर्जाच्या काही राजकीय नेत्यांमध्ये कुठून आला हे कळण्यास मार्ग नाही, पण सध्यातरी त्यांना तोच सत्तेचा राजमार्ग वाटतो. कारण जी-२० च्या वेळी परदेशी पाहुण्यांसाठी रस्त्यांवरच्या प्रत्येक खांबाला लाल दिव्यांच्या माळा गुंडाळणाऱ्या आमच्या कारभाऱ्याची कीव न आली तरच नवलं. हे सुशोभीकरण कमी होते की काय म्हणून लोकसभेच्या प्रचारपत्रकात नदी स्वच्छता प्रकल्पाचे फोटोशॉप केलेले छायाचित्र टाकण्याची वेळ आमच्या कारभाऱ्यांवर आली असल्याचे समजते! विकासकामांची,




जबाबदारी आता मतदारांची असेल. फक्त लोकसभाच नव्हे तर त्यापाठोपाठ येणाऱ्या विधानसभा, महानगरपालिका निवडणुकादेखील सुज्ञ मतदारांनी हाती घेण्याची गरज भासू लागली आहे. दोन दोन वर्षे प्रभागांमध्ये नगरसेवक, महापौर नसल्यामुळे शहरातील मुलभूत सोयीसुविधांचा जो काही बोजवारा उडाला आहे, तो केवळ डोळ्यांवर बांधलेल्या सत्तेच्या पट्टीमुळे दिसत नाही की काय ही शंका सर्वसामान्य माणसाला भेडसावते आहे. साधी प्रभागातील दैनंदिन स्वच्छता असेल कचरागाड्याची व्यवस्था असेल, अनधिकृतपणे, नियम धाब्यावर बसवून होणारी शहरांतील बांधकामे असतील रोजगारांची जेवढी अपेक्षा राजकीय कारभाऱ्यांकडून आहे, तेवढीच किंबहुना त्यापेक्षा जास्त अपेक्षा आहे ती महाराष्ट्राचे सांस्कृतिक, सामाजिक वातावरण, नीतिमत्ता आणि नैतिक अधिष्ठान जपण्याची. बुंदसे गयी वो हौदसे नही आती, पण कदाचित अजूनही महाराष्ट्राचे निर्मळ सामाजिक वातावरण जपता आले, जपून ठेवता आले तर तेही नसे थोडके!

आज सगळ्यात जास्त राजकीय चोथा महाराष्ट्रामध्ये झाला आहे ही सर्वसामान्यांच्या मनातील भावना दूर करण्याचे मोठे आव्हान सर्वपक्षीय राजकीय नेत्यांना पेलावे लागेल. सध्यातरी निवडणूका जिंकण्यापेक्षा कदाचित हेच जास्त कठीण दिसते.

# शिक्षणातील 'प्रभुत्वा'ची आयआयटींनाही झळ

आयआयटी- मुंबईच्या सामाजिकशास्त्र विभागातील पीएच.डी. प्रवेश परीक्षेत विचारला गेलेला एक प्रश्न सध्या 'वादग्रस्त' ठरवला जात असताना, त्या प्रश्नात ज्या विचारवंताचा उल्लेख झाला त्या ण्टोनिओ ग्राम्शी यांचे समाजसिद्धान्त आजच्या आपल्या शिक्षण व्यवस्थेलाही कसे लागू ठरतात, याचे हे विवेचन..



अभ्यासक्रम शिकविताना धार्मिक भावना दुखावल्या या सबबीखाली पुण्यातील सिंबायोसिस कला व वाणिज्य महाविद्यालयातील एका प्राध्यापकाला ऑगस्ट २०२३ मध्ये अटक करण्यात आली. त्याला लगोलग निलंबितदेखील करण्यात आले. त्यापाठोपाठ फेब्रुवारी २०२४ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ललित कला केंद्रात परीक्षा सुरू असताना केंद्राच्या प्रमुखाला अटक करण्यात आली. आता मुंबईतील आयआयटीच्या समाजशास्त्राच्या पीएच. डी. प्रवेश परीक्षेतील प्रश्नावर आक्षेप घेऊन संबंधितांना दंडित करण्यात यावे, अशी मागणी होत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'ऑर्गनायझर' या मुखपत्राच्या संकेतस्थळावर या मागणीला अलीकडेच (१५ मे) प्रसिद्धी देण्यात आली. प्रवेश परीक्षेत विचारण्यात आलेला हा प्रश्न इटलीतील सुप्रसिद्ध विचारवंत ॲण्टोनिओ ग्राम्शी यांच्या 'प्रभुत्व' संकल्पनेविषयी व 'हिंदुत्व' याविषयी होता.

ॲण्टोनिओ ग्राम्शी हे विसाव्या शतकातील सर्वांत महत्त्वाचे तत्त्वचिंतक समजले जातात. त्यांच्या अनेक संकल्पनांपैकी 'प्रभुत्व' (हेजिमनी) ही एक संकल्पना आहे. दुसऱ्या महायुद्धापूर्वी युरोपमध्ये भांडवलदारी व्यवस्था संकटात सापडलेली असताना कामगार वर्गाने क्रांती का केली नाही, या समस्येचा तुरुंगातील वास्तव्यात शोध घेत असताना त्यांनी 'प्रभुत्व' या संकल्पनेचा विकास केला. त्यांच्या मते, सत्ताधारी वर्ग हा सामान्यजनांवर राज्य करण्यासाठी पाशवी बळापेक्षा 'सांस्कृतिक वर्चस्व' निर्माण करण्याची भूमिका घेतो. असे सांस्कृतिक वर्चस्व म्हणजेच प्रभुत्व! असे प्रभुत्व निर्माण करण्यासाठी विचारप्रणालीद्वारे मोठ्या समूहाला अंकित केले जाते आणि अशा समूहाने सत्ताधारी वर्गाचे आधिपत्य स्वेच्छेने स्वीकारणे अपेक्षित असते. हे साध्य करण्यासाठी शिक्षणासारखे प्रभावी माध्यम वापरण्यापासून सत्ताधारी वर्ग चुकत नाही. मनुष्यबळ आणि उपभोक्तेच हवे आधुनिक काळातील शिक्षणाचे मुख्य प्रयोजन हे कारखानदारी उत्पादन पद्धतीवर आधारलेल्या समाजाची भौतिक आणि विचारप्रणालीत्मक (आयडिऑलॉजिकल) गरज भागविणे, हे असते. नव्या उत्पादन पद्धतीला आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करणे आणि व्यापक समाजाचे रूपांतर उपभोक्त्या समाजात करणे, ही दोन उद्दिष्टे आधुनिक शिक्षणाने पूर्ण करणे अपेक्षित असते. विसाव्या शतकात ॲण्टोनिओ ग्राम्शी, लुई अल्थुझर, मिशेल फुको, पाऊलो फ्रेअरी आणि यर्गन हबरमास या अभ्यासकांनी शिक्षणाच्या भौतिक कार्यापेक्षा विचारप्रणालीत्मक कार्याला अधिक महत्त्व दिले. सत्ताधारी वर्गाचे बुद्धिजीवी शिक्षण व्यवस्थेवर बारीक लक्ष ठेवून का असतात आणि आयआयटीसारखी प्रकरणे का उद्भवतात, याची कळ इथे आहे. विषमतेवर आधारलेल्या शोषणाधिष्ठित समाजव्यवस्थेला नवशिक्षितांनी उचलून धरावे, या हेतूने आधुनिक शिक्षणाची आखणी केली जाते. नवी भांडवलदारी मूल्यव्यवस्था नव-शिक्षितांनी स्वेच्छेने स्वीकारावी, या हेतूने आधुनिक शिक्षण व्यवस्था कार्यरत राहते. आधुनिक भांडवलदारी सत्ताधारी वर्ग समाजाला निरक्षर ठेवून राज्य गाजविण्याची भूमिका घेत नाही. त्यापेक्षा, शिक्षणाद्वारे स्ववर्गवर्चस्वपोषक मूल्यांच्या व्यापक प्रसार-प्रचार करण्याची भूमिका घेणे त्याला इष्ट वाटते. त्यासाठी शिक्षण व्यवस्थेला अर्थपुरवठा करून ही व्यवस्था विचारप्रणालीत्मक हस्तक्षेपासाठी खुली ठेवली जाते. विचारप्रणालीत्मक हस्तक्षेपास वाव असलेल्या सरकारपुरस्कृत, सरकारनियमित शिक्षण व्यवस्थेचा पुरस्कार हा सत्ताधारी वर्ग करतो. आधुनिक काळात शिक्षण हा विचारप्रणालीत्मक हल्ला असतो, असे काही अभ्यासकांनी मांडले आहे. एकंदरच, प्रस्थापित समाजव्यवस्थेच्या संरक्षण-संवर्धनात आधुनिक शिक्षण व्यवस्था महत्त्वाची भूमिका पार पाडते. ग्राम्शीविचार आणि शिक्षण 'व्यवस्था' वरील आकलन विकसित करण्यात ज्या विचारवंताविषयी आयआयटीच्या परीक्षेत प्रश्न विचारण्यात आला होता त्या ण्टोनिओ ग्राम्शी याचे योगदान मोठे आहे. ग्राम्शीच्या मते, नव्या समाजाला आवश्यक अशा बुद्धिजीवी वर्गाची निर्मिती करण्यासाठी उच्च शिक्षण संस्थांना जुंपले जाते. हा वर्ग भांडवलदारी व्यवस्थेचा जैविक बुद्धिजीवी (ऑरगॅनिक इंटलेक्च्युअल) असतो. तो या व्यवस्थेला एकत्व बहाल करतो आणि या व्यवस्थेच्या अडथळाविहीन पुनरुत्पादनाची हमी देतो. बुद्धिजीवी वर्गाशिवाय उत्पादन व्यवस्था अस्तित्वात राहू शकत नाहीत. इंजिनीअर हे या उत्पादन व्यवस्थेचे जैविक बुद्धिजीवी असतात.

नेहरूंनी भारतात आयआयटींची स्थापना केली तेव्हा या संस्थांकडून त्यांनी अशीच अपेक्षा व्यक्त केली होती. कोणत्याही औद्योगिक समाजात तंत्रज्ञ आणि तंत्रशहा यांना विशेष असे महत्त्व असते. स्वातंत्र्योत्तर भारतीय सत्ताधाऱ्यांना भारत एक बलाढ्य औद्योगिक शक्ती म्हणून उभारायची होती. त्यासाठी आयआयटीसारख्या महागड्या संस्था आवश्यक समजल्या गेल्या. अगदी जनतेच्या प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या घटनादत्त जबाबदारीची तिलांजली देऊन हे पांढरे हत्ती पोसले गेले. सरकारी खर्चाने भांडवलदार वर्गाला तंत्रज्ञ पुरविणाऱ्या या संस्था होत्या.तरीही, अशा संस्थांमधून केवळ यांत्रिकपणे विचार करणारे रुक्ष तंत्रशहा निर्माण होऊ नयेत म्हणून या संस्थांमध्ये मानव्यविद्या आणि सामाजिक विज्ञान विभागदेखील सुरू करण्यात आले होते. ग्राम्शीच्या मते, उच्च शिक्षणाच्या अशा संस्था 'प्रति-प्रभुत्वा'साठी उपयुक्त ठरू शकतात. एकीकडे सत्ताधारी व दुसरीकडे सत्तेला प्रश्नांकित करू पाहणारे समुदाय यांच्या स्पर्धात्मकतेत उच्च शिक्षण संस्था हेलकावे खात असतात. अर्थातच, या स्पर्धेत सत्ताधारी प्रभावी राहिल्यामुळे तो आयआयटीसारख्या संस्थांत आंबेडकर-पेरियार अभ्यासवर्ग बंद करतो. नेहरूंनी एका ध्येयवादातून सामाजिक विज्ञानासह सुरू करण्यात आलेल्या आयआयटीसारख्या शिक्षण संस्थांमधून सामाजिक जाणिवेचे पदवीधर का निर्माण होत नाहीत, याचे उत्तर ग्राम्शीच्या मदतीने देता येईल. ग्राम्शीच्या मते, आधुनिक शिक्षणाची प्रवृत्ती ज्ञानाचे विखंडन (तुकडेकरण) करण्याकडे असते. शिक्षितांना व्यवस्थेचे समग्र आकलन होऊ नये, यासाठी हे आवश्यक असते.

अलीकडे बाजारवादाचा प्रभाव सर्वच शिक्षण संस्थांवर वाढत असल्यामुळे ज्ञानाच्या तुकडीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. आयआयटीमधील सामाजिक विज्ञानाच्या विभागांकडे विद्यार्थ्यांचे दुर्लक्ष वाढलेले आहे, अशी तक्रार अंजना सुब्रमणियन यांनी त्यांच्या 'कास्ट ऑफ मेरिट' या भारतातील आयआयटींवरील पुस्तकात केली आहे.शिक्षणाचे नियंत्रण ग्राम्शी ज्या इटलीत जगत होता तो इटली मुसोलिनीच्या फॅसिस्ट पक्षाच्या वरवंट्याखाली रगडला जात होता. हा फॅसिझम म्हणजे तीव्र अशा राष्ट्रवादाचा विकृत अवतार होता. अशा राजवटीतील राष्ट्रवाद हा इतिहासाचे मिथक उभे करतो. धर्म या मिथकाचा मुख्य आधार बनू शकतो. अशा राजवटीत विशिष्ट अशा समुदायाचे दानवीकरण करणे, इतिहासातील कथित चुका दुरुस्त करणे व विशिष्ट वर्गाचे आधिपत्य निर्माण करण्याचे राष्ट्रवाद हे साधन होते. विद्यार्थ्यांमधून चिकित्सक नागरिक घडविण्यापेक्षा त्यांना कौशल्याचे शिक्षण देऊन उत्पादनाचे सैनिक बनविले जाते. यासाठी फॅसिस्ट राजवटी शिक्षण व्यवस्थेला वेठीस धरतात.प्रस्थापित वर्गाच्या आधिपत्याची पूर्वशर्त ही शिक्षण व्यवस्थेच्या माध्यमातून नवशिक्षितांचे मानस घडविणे ही राहिली. त्यासाठी ते अभ्यासक्रम, पाठ्यक्रम आणि पाठ्यपुस्तक यांच्या नियंत्रणाचे राजकारण करतात. शिक्षण संस्था या वर्गासाठी एक प्रकारची युद्धभूमी असते. ग्राम्शीसाठी अशी शिक्षण व्यवस्था बदलणे हे कोणत्याही मूलगामी बदलाची पूर्वशर्त होती.

# उन्हाळ्यात भरपूर पाणी पिऊनही मलावरोध का होतो?

उन्हाळ्यामध्ये ज्या तक्रारींनी रुग्ण बेजार होतात, त्यातली एक महत्त्वाची तक्रार म्हणजे मलावरोध किंवा शौचाला साफ न होणे. काही रुग्णांना मलावरोधाचा एवढा त्रास होतो की कुंथल्याशिवाय त्यांना शौचास होतच नाही किंवा कडक मलप्रवृत्ती होऊन मलविसर्जनाचे वेळी वेदना होतात. या दोन्हीं कारणांमुळे अनेकांना पाईल्स, फिशर्स अशागुदविकारांचा त्रास सुद्धा होतो.



उपचारासाठी येणार्या अनेक लहान मुलांनासुद्धा या उन्हाळ्यात तीन-तीन,चार-चार दिवसांनी शौचास होते व जेव्हा होते तेव्हा खड्याच्या स्वरुपात होते. वास्तवात मलावरोधाचा त्रास हिवाळ्यात अधिक होतो. (वातावरणामध्ये व शरीरामध्ये वाढलेला कोरडेपणा, आहारामध्ये तेलतुपाची कमी, चलनवलनाचा अभाव व कमी जलप्राशन ही त्यामागची कारणे), मात्र उन्हाळ्यात तर वातावरण कोरडे नसते, उलट दमट व उष्ण असते आणि आपण पाणीसुद्धा भरपूर प्रमाणात पितो, अगदी वारंवार, ते इतके की पाण्यानेच पोट टम्म् फुगते! मग तरीही उन्हाळ्यामध्ये मलावरोधाचा त्रास का व्हावा?

मलावरोध का होतो? मलावरोध होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मलाला मृदुता (नरमपणा) येत नाही. पण भरपूर पाणी पिऊनही मल मृदू (नरम) न होता कठीण का होतो? याचाच अर्थ प्राशन केलेले पाणी मलापर्यंत पोहोचत नाही. मग आपण पितो ते पाणी जाते कुठे? ते जाते उष्म्याच्या काहिलीने शरीरामधून कमी झालेल्या पाण्याची भरपाई करण्यामध्ये. इतर ऋतूंच्या तुलनेमध्ये उन्हाळ्यामध्ये शरीराची पाण्याची गरज दुपटीने वाढते, त्यात अंगाची काहिली होत असते त्या उष्म्यामध्ये तर अधिकच. साहजिकच शरीराची पाण्याची कमी भरुन काढण्याला शरीर अधिक महत्त्व देते.

अंगातला उष्मा कमी व्हावा म्हणून लोक थंड पेयं पित असतात, जसे की सरबत, नारळ पाणी, शीत पेयं, फळांचे रस वगैरे. परंतु, ही थंड पेयं मलावरोध कमी करण्यासाठी उपयोगी पडत नाहीत असे दिसते. तुम्ही जेवढे थंड पाणी (वा थंड पेयं) पिता त्यातला बराचसा भाग लहान आतड्यांमार्फत शोषला जातो. शरीराची द्रवहानी भरून काढण्यास उपयोगी पडतो व नंतर मूत्रविसर्जनावाटे शरीराबाहेर फेकला जातो. ते पाणी जितक्या मात्रेमध्ये आवश्यक असते तितक्या मात्रेमध्ये मोठ्या आतड्यांपर्यंत पोहोचत नाही. पाणी मोठ्या आतड्यापर्यंत पर्याप्त प्रमाणात पोहोचले तरच तिथल्या मलाची कठीणता कमी होऊन तो मृदु होणार ना?

थंड पदार्थाचा गुण जाणून घ्या आयुर्वेदानुसारसुद्धा थंड पदार्थांचा गुण आहे स्तंभन अर्थात रोखणे, अडवणे, ज्या गुणानुसार थंड स्पर्शाची किंवा थंड गुणांची पेयं मलाला रोखतात, अडवतात. एकंदरच थंड पाण्याचा हा मोठाच दोष म्हणायला हवा की, ते मूत्रविसर्जन वाढवते मात्र मलविसर्जनास साहाय्यक होत नाही. त्यातही ज्या वातप्रकृतीच्या व्यक्ती असतात, त्यांच्या शरीरामध्ये स्वाभाविकरित्या कोरडेपणा असतो. त्यांच्या आतड्यामध्ये स्त्रवणारे नैसर्गिक स्त्राव इतरांच्या तुलनेमध्ये कमी असल्याने त्यांचा मल मुळातच कोरडा असतो, जो उन्हाळ्यामध्ये पाण्याच्याअभावी अधिकच कोरडा होऊन मलावरोध वाढतो. सोपा घरगुती उपाय उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये ज्यांना हा मलावरोधाचा त्रास जाणवतो, त्यांच्यासाठी सोपा उपाय म्हणजे कोमट पाणी पिणे. उन्हाळ्यात कोमट पाणी पिण्याचा हा सल्ला कोणाला अगोचर वाटेल, पण ज्यांना कठीण मल होतो व त्यामुळे मलविसर्जन करताना त्रास होतो, त्यांच्यासाठी हा सहजसाध्य असा उपाय आहे. अर्थात मलावरोधाला कारणीभूत तंतुयुक्त आहाराचा अभाव, आहारामध्ये स्नेह म्हणजे तेलतुपाची कमी, चलनवलनाचा- व्यायामाचा अभाव (त्यातही विशेषकरुन पोटाच्या व्यायामाचा अभाव) या इतर कारणांचाही विचार करायला हवा. सांगण्याचा मथितार्थ हाच की, उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये भरपूर पाणी प्यायलात, मात्र ते थंड असेल, तर मलावरोधाची तक्रार दूर होणार नाही.

# कौलारू घरांच्या दुरुस्तीची लगबग! मातीच्या घरांचे आकर्षण वाढले; शेणाने घराला सारवणे आरोग्यासाठी महत्त्वाचे

तळोदा : अलीकडच्या काळात सिमेंटच्या घरांचे प्रमाण वाढले असले तरी सातपुड्याच्या ग्रामीण, तसेच दुर्गम भागात मातीपासून तयार करण्यात आलेल्या कौलारू घरांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. पावसाळा जवळ आल्याने गेल्या काही दिवसांपासून कौलारू घरांची डागडुजी करण्याचे काम अनेकांनी हाती घेतले आहे. त्यामुळे या भागात सर्वत्र कौलारू घरांची दुरुस्तीची लगबग सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे. अलीकडे सिमेंटच्या घरांचे प्रमाण वाढले असले तरी नंदुरबार जिल्ह्यातील विशेषतः सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागात आजही मातीचे घरे मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. सातपुड्याच्या अतिदुर्गम भागात तर सर्वत्र मातीपासून तयार केलेली झोपडी किंवा कौलारू घरे नजरेस पडतात. पुढच्या महिन्यात पावसाळा सुरू होणार आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी घरांची दुरुस्ती करणे गरजेचे असल्याने, सध्या ग्रामीण भागात घरांची दुरुस्ती करताना सर्वजण दिसून येत आहेत.



कौलारू घरे दुरुस्त करण्याचा अनुभव खूप कमी लोकांना असल्याने, संबंधित लोकांची मनधरणी करताना घरमालकाच्या नाकीनऊ येत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे घरमालक स्वतः कुटुंबाचा मदतीने घराची दुरुस्ती करीत असल्याचे दिसून येत आहे.

सातपुड्याच्या परिसरात व पायथ्याशी असलेल्या विविध भागांमधील आदिवासी समुदायांची पारंपरिक घरे ही माती, शेण व कौलारू असतात. त्यांची रचना काँक्रिटच्या घरांपेक्षा चांगली असते. या मातीच्या घरात आरामदायक जीवन असते. शेणाने घराला सारवणे हे आरोग्यासाठी महत्त्वाचे असते आणि यामुळे अनेक रोगांपासून बचाव होतो असे आदिवासी जाणकार म्हणतात. त्यामुळे घरांचे आकर्षण वाढले आहे. सातपुड्याच्या ग्रामीण व दुर्गम भागातील घरे ही माती व लाकडापासून तयार होतात. घरांच्या वरती बांबूची चपटे असतात आणि त्यावर मातीचे कौलं. भिंत तयार करण्यासाठी बांबूच्या चापट्यापासून बनविलेले तट्टे वापरण्यात येतात. यासाठी कापसाच्या काड्यांचा वापरदेखील करण्यात येत आहे. त्यावर माती, शेणाने सारवले जाते आणि मग घर तयार होते.

आदिवासी लोक ज्या भागात राहतात त्याठिकाणी पूर्वी खूपच मोठ्या प्रमाणात मातीचा घरं होती. पण आता ही मातीचे घरे कमी होत आहेत. त्यामुळे आदिवासी पारंपरिक भाव-भावना, मूल्ये, रीति-रिवाज, आचार, विचार आणि आरोग्यावर देखील याचा परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

# एका वेळच्या जेवणात भात व पोळ्यांचे आदर्श प्रमाण किती हवे? ताटात कुठल्या गोष्टी किती टक्के हव्यात? तज्ज्ञांनी दिलं सूत्र

भारतात उत्तरपासून ते दक्षिणेपर्यंत व पूर्व - पश्चिम सर्वत्रच जेवणात ऊर्जेचा मुख्य स्रोत म्हणून कार्ब्सचा समावेश केला जातो. स्वरूपात कदाचित पोळी- भात असं वेगवेगळं असलं तरी त्या तांदूळ व गव्हामध्ये कार्ब्स असतातच. आजवर अनेकदा अभ्यासात समोर आलेल्या माहितीनुसार लठ्ठपणा व मधुमेहासाठी कार्ब्स हा मुख्य कारणीभूत घटक ठरू शकतो. म्हणूनच अनेकदा आपल्या ताटातील पोषणाचे विभाजन करताना धान्य व तृणधान्यापासून मिळणाऱ्या कार्बोहायड्रेटचे प्रमाण हे एक पंचमांशच असावे असा सल्ला तज्ज्ञ देतात. अर्थात हे प्रमाण आरोग्यदायी असलं तरी भारतीय परंपरेतच मोजून मापून जेवण वाढण्याची पद्धत दिसत नाही. वाढताना वाढणाऱ्याने आग्रह करावा हा आपल्याकडे अलिखित नियम आहे. अशावेळी आपण योग्य प्रमाणात कार्ब्सचे सेवन करतोय का याची खात्री करून घेण्यासाठी आपण आज सोपे मार्ग जाणून घेणार आहोत.




ताटात पोषणाची विभागणी कशी करावी?

फंक्शनल मेडिसिन तज्ज्ञ विजय ठक्कर यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, आपल्या दैनंदिन आहारात कार्ब्सचे प्रमाण हे ६२ टक्के असू शकते. यातही २१ टक्के कार्ब्स हे धान्य व तृणधान्यांमधून व ३३ टक्के कार्ब्स हे भाज्यांमधून मिळायला हवेत. आठ टक्के कार्ब्सची जागा आपण फळांनी भरून काढायला हवी. यामुळे तुम्हाला अन्य पोषण सत्वांना एकत्रित करून संतुलित आहार घेता येऊ शकतो. याशिवाय आपल्याला प्रथिने व स्निग्ध पदार्थांची गरज पूर्ण करण्यासाठी ताटात कडधान्ये, शेंगा, अंडी, मांस यांचा समावेश सात टक्के करायचा आहे. दुग्धजन्य पदार्थ किंवा ताक/ लस्सीसारखी पेय आहारात २६ टक्के असायला हवीत. शेवटी आवश्यक फॅट्स प्राप्त करण्यासाठी तेल, नट्स, बियांना २ ते ३ टक्के प्रमाणात आहारात जोडावे.

तांदूळ आणि गव्हाचे प्रमाण कसे असावे?

दररोज १-२ सर्व्हिंगपर्यंत तांदळाचे सेवन मर्यादित ठेवावे. एक सर्व्हिंग म्हणजे साधारण अर्धा कप शिजवलेला भात. या प्रकारचा पोर्शन कंट्रोल हा इतर पोषक घटकांसाठी जागा देताना तुमचे कार्बोहायड्रेटचे सेवन नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

गहू सामान्यतः पोळी किंवा ब्रेड म्हणून खाल्ला जातो, म्हणून तुमचे सेवन प्रति जेवण १ - २ पोळ्यांपुरते मर्यादित ठेवा. प्रत्येक चपाती साधारणपणे अर्धा कप शिजवलेल्या भाताच्या कार्बोहायड्रेटच्या बरोबरीची असते.

तुमच्या आहारात तांदूळ आणि गहू यांचे वर्चस्व असल्याचे तुम्हाला आढळल्यास, खालील मार्ग आपण सेवनावर नियंत्रण मिळवू शकता.

मोजायला लागा: जेवण वाढताना मोजू नये म्हणतात पण तुम्हाला आरोग्याची काळजी असेल तर प्रमाण मोजायला लागा. कमी प्रमाण अधिक भासावे यासाठी वाटल्यास डिश लहान वापरा.

भाज्यांचे सेवन वाढवा: आपल्याला उपाशी राहायचे नाही आहे हे ही मनाला सांगा. आपण पालक, ब्रोकोली आणि गाजर यांसारख्या स्टार्च नसलेल्या भाज्यांनी तुमच्या प्लेटचा एक तृतीयांश भाग भरू शकता. या भाज्यांमध्ये कॅलरी आणि स्टार्च कमी आणि फायबरचे प्रमाण जास्त आहे, ज्यामुळे ते निरोगी वजन राखण्यासाठी आणि रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी एक उत्कृष्ट पर्याय बनतात. असं केल्याने फायबर आणि पोषक तत्वांचे सेवन वाढून कार्ब्सचे सेवन कमी होऊ शकते.

संपूर्ण धान्य निवडा: तपकिरी तांदूळ किंवा संपूर्ण गहू निवडा कारण त्यामध्ये जास्त फायबर आणि पोषक सत्व असतात, ज्यामुळे तुम्हाला जास्त काळ पोट भरल्यासारखे वाटेल

अशाप्रकारच्या आहाराची सवय तयार करणे आवश्यक आहे यासाठी आपण काय करू शकता की..

जेवणाचे पूर्वनियोजन करा, आपल्याला काय खायचे आहे हे समजल्यावर किती खायचे आहे हे स्वतःला समाजवणे सोपेजाते

शक्य होईल तेवढं घरीच जेवण शिजवून खा. वाटल्यास आपण पोर्शन कंट्रोलला पाठिंबा देणाऱ्या वेगवेगळ्या रेसिपी ट्राय करून पाहू शकता. अन्न सजवायला सुरुवात करा ज्यामुळे आपल्याला काही प्रमाणात समोर पदार्थ बघून तृप्त झाल्याचा भास होऊ शकतो.

हळूहळू खा आणि प्रत्येक घासाचा आस्वाद घ्या, यामुळे तुम्हाला प्रमाणात खाण्यासाठी मदत होऊ शकते.

तांदूळ आणि गव्हाला पर्याय काय?

बाजरी हा एक पौष्टिक पर्याय आहे आणि त्यांचा आहारात समावेश करणे तुम्हाला वाटते त्यापेक्षा सोपे आहे. त्यामध्ये फायबर, प्रथिने आणि आवश्यक खनिजे जास्त असतात आपण मोती बाजरी (बाजरी), फिंगर बाजरी (नाचणी) आणि फॉक्सटेल बाजरी (कांगणी) यांसारखी विविध पीठं वापरून पाहू शकता, दिवसातून एका जेवणात तरी बाजारापासून बनवलेल्या पदार्थांचा समावेश काय.

अगदी भाकरीच खायला हवी असेही काही नाही आपण बाजरीची खिचडी, उपमा आणि डोसा यांसारख्या पाककृतींचा प्रयोग करा व पोळ्यांचे

# सध्या वळवाचा पाऊस पडत असल्याने घ्या आरोग्याची काळजी

उन्हाळ्याच्या अखेरीस मे महिन्यात वादळी वाऱ्यासह मॉन्सनपूर्व पाऊस होत आहे. त्यातच मॉन्सूनने अंदमानात हजेरी लावली. जूनच्या पहिल्या आठवड्यात मॉन्सून राज्यात येऊ शकतो. या पाश्वर्श्वभूमीवर पावसाळ्यात आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे असते.पावसाळ्यात पाण्याशी संबंधित व्याधी उद्भवतात. पोटाच्या तक्रारीही डोके वर काढण्याची शक्यता असते. टायफॉइड, डायरिया, काविळीची साथ पसरत असते. रस्त्यावर जागोजागी तुंबलेल्या पाण्यात डासांची पैदास होते. परिणामी, यामुळे मलेरिया डेंगीचा प्रादुर्भाव होतो.पावळ्यात इन्फेक्शन, कफ, सर्दी होण्याची शक्यता असते. या काळात हलके जेवणासह तिखट, कांदा भजी, बटाटावडा असे तेलकट पदार्थ खाण्याचा टाळल्यास शरीरात कोणत्याही प्रकारचे इन्फेक्शन होत नाही. परंतु, आजाराची लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेतल्यास आजार दूर करता येतो. उद्भवणारे आजार पावसाच्या दिवसांत पचन न होणारा आहार घेतल्यास शारीरिक स्वास्थ्य बिघडण्याची शक्यता असते. त्यासाठी थंड पदार्थ, तेलकट पदार्थ, फास्ट फूड, उपवासासाठी शेंगदाणे, भगर हे पदार्थ खाणे टाळावे. पचायला हलके आणि उष्ण पदार्थ शक्यतो घ्यावे. यामध्ये बेसन लाडू, टोमॅटो सूप, वांगी, भेंडवळ, कैरी, लिंबू, चिंच, सुखे खोबरे या पदार्थांचा वापर करावा.शिवाय तांदूळ, गहू, यापासून विविध पदार्थ बनवून याचे सेवन केल्यास आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. डास चावल्यामुळे हिवताप, मलेरिया होतो, एनॉफिलीस जातीच्या मच्छराने दंश केल्यास हिवतापाची लागण लगेच होते. सर्दी, खोकला अंगावर ओले कपडे जास्त वेळ, पावसात भिजणे यामुळे सर्दी खोकल्यासारखे किरकोळ आजार उद्भवतात. ढगाळ वातावरणामुळे पावसाळ्यात दमा असणाऱ्या रुग्णांना त्रास जास्त जाणवतो. दमट, गार हवा आणि मंद पचनशक्ती यामुळे दम्याचा त्रास वाढतो. तसेच पावसाळ्यात पाण्याचे प्रदूषण जास्त होते.अन्नपचन मंदावते पावसाळ्यातील थंड वातावरण व पावसात साचलेल्या पाण्यातून अनेक प्रकारचे आजार निर्माण होतात. त्यातच वातावरणामुळे जाठराग्नी मंद झालेला असतो म्हणजेच अन्नपचन मंदावलेले असते. पोट बिघडून उलट्या होणे, जुलाब लागणे व भूक न लागणे अशा पोटाच्या तक्रारी चालू होतात.त्यामुळे घरी शिजवलेले, ताजे, हलके व स्वच्छ अन् खावे, बाहेरचे, उघड्यावरील चमचमीत पदार्थ टाळावेत. संध्याकाळी दरवाजे व खिडक्या लवकर बंद करून घेणे व डास आपल्याला चावणार नाहीत याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे. वर्षा ऋतू मध्ये वात प्रकोप होत असतो. त्यामुळे सांधेदुखी चे आजार वाढण्याची शक्यता असते.

# गवती चहामुळे होईल ताण-तणावाची सुट्टी ! जाणून घ्या 'हे' आरोग्यदायी फायदे

दिवसाची सुरूवात अनेक जण चहा किंवा कॉफीच्या सेवनाने करतात. या उलट काही जण कोमट पाणी पितात तर काही जण ग्रीन टीने दिवसाची सुरूवात करतात. अनेकांना चहामध्ये आलं किंवा गवती चहा घातलेला आवडतो. यामुळे, चहाला छान चव येते आणि असा चहा आरोग्यासाठी देखील फायदेशीर असतो.

रिकाम्या पोटी गवती चहा घातलेला चहा प्यायल्याचे अनेक फायदे आपल्या आरोग्याला होतात. गवती चहामध्ये मोठ्या प्रमाणात झिंक, मॅग्नेशिअम, तांबे, पोटॅशिअम, लोह, फॉस्फरस आणि कॅल्शिअम आणि इतर जीवनसत्वांचा समावेश आढळून येतो. त्यामुळे, हा बहुगुणी गवती चहा आपल्या आरोग्यासाठी अतिशय लाभदायी आहे. आज आपण आंतरराष्ट्रीय चहा दिनानिमित्त गवती चहाचे आरोग्याला होणारे फायदे कोणते आहेत? ते जाणून घेऊयात.

वजन नियंत्रित करते गवती चहामध्ये असलेले सायट्रलचा वापर हा दीर्घकाळापासून लठ्ठपणाला प्रतिबंध आणि त्यावर उपचार करण्यासाठी केला जात आहे. गवती चहाचे सेवन केल्याने शरीरात जमा झालेली चरबी कमी होण्यास मदत होते. जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल, तर नियमितपणे गवती चहा घातलेला चहाचे सेवन करा. यामुळे, वजन कमी करण्यास किंवा वजन नियंत्रित राहू शकेल. मात्र, याचे सेवन मर्यादित प्रमाणात करायला विसरू नका.

पोषकघटकांनी परिपूर्ण

गवती चहाचा सुगंध हा लिंबासारखा आंबट-गोड आणि परिपूर्ण असतो. त्यामुळे, याचा वापर चहामध्ये केल्याने चहाला देखील छान चव येते. गवती चहा हा ताजा किंवा वाळवून देखील त्याचा वापर केला जातो.

गवती चहामध्ये मोठ्या प्रमाणात अँटीफंगल आणि अँटीबॅक्टेरिअल तसेच, अँटीइंफ्लेमेंटरी इत्यादी गुणधर्म आणि विविध पोषकघटकांचा समावेश असतो. त्यामुळे, याचे सेवन केल्याने आपले आरोग्य निरोगी राहण्यास मदत होते.

तणाव कमी करते




गवती चहामध्ये अँटीडिप्रेसंट गुणधर्म मोठ्या प्रमाणात आढळून येतात. हे गुणधर्म चिंता आणि नैराश्याच्या लक्षणांपासून मुक्त होण्यास मदत करतात. हे गुणधर्म सेरोटोनिनला प्रोत्साहन देण्याचे काम करते. सेरोटोनिन हे एक प्रकारचे मेंदूतील रसायन आहे. जे आपल्या मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे.त्यामुळे, गवची चहा हा आपला ताण-तणाव आणि चिंता दूर करण्यास उपयुक्त ठरतो. यामुळे, आपला मूड देखील सुधारतो. मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी तुमच्या आहारात गवती चहाचा अवश्य समावेश करा.

# मागाठाणे विधानसभा वार्ड क्रमांक २६ येथे बोगस मतदान. वंचिततर्फे कारवाईची मागणी. तसेच मुंबई व मुंबई उपनगरात संत गतीने मतदान.

मुंबई/ शहामत शेख. धुळे,नाशिक,मुंबई, पालघर भिवंडी ठाणे दिंडोरी २० मे रोजी पाचव्या टप्प्यातील मतदान पार पडले. मुंबईत एकूण ५६.६८ टक्के मतदान झाले. उत्तर मुंबई जिल्ह्यात ४६.९१ टक्के मतदान झाले.परंतु काही ठिकाणी बोगस मतदान होताना दिसून आले. सर्व मतदान केंद्रावर सुरळीत मतदान पार पडत असताना उत्तर मुंबई जिल्ह्यातील मागाठाणे विधानसभा मतदार संघात वार्ड क्रमांक २६ येथे बोगस मतदान आढळून आले. सविस्तर बाब अशी की,रुखसाना शेख सरस्वती विद्यालय बूथ क्रमांक २४०, मतदान यादी क्रमांक १५४, अनुक्रमांक ४६७, या क्रमांक वरील मतदान करण्यासाठी गेल्यानंतर त्यांना कळलं की आपल्या नावाचे मतदान दुसऱ्याने केलं आहे. यांच्या नावे सकाळीच मतदान झाले आहे. या मतदान बूथ वरील झोनल ऑफिसर विकास मिश्रा, पब्लिक रिलेशन ऑफिसर विजयकुमार नीदर्शनास आले असता रुकसाना शेख यांचा मतदानाचा हक्क वाया जाऊ नये म्हणून या बूथ झोनल ऑफिसर मिश्रा यांनी १७/इ नंबरचा फॉर्म भरून पोस्टल बॅलेट द्वारे वोट करून घेण्याची सुविधा उपलब्ध करून दिली. हे मतदान काउंटिंग निश्चित होईल अशी श्वास्वती वंचित बहुजन आघाडी कार्यकर्त्यांना दिली. तसेच बोगस मतदातावर कारवाई व्हावी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने संबंधित विभागाकडे लेखी निवेदन द्वारे मागणी करणार आहे. तसेच मुंबई व मुंबई उपनगर पाचव्या टप्प्यातील किंवा शेवटच्या टप्प्यातील मतदान पार पडले. संथ गतीने सुरू असल्याने मतदारांना तासंनतास रांगेत ताटकळत उभे राहावे लागले. मुंबई व मुंबई उपनगरात अशा अनेक घटना दिसून आले.मतदान केंद्रावर लांबच्या लांब रांगा व उन्हाचा तडाखा यामुळे अनेक मतदार मतदान न करता माघारी फिरले. उत्तर मुंबई जिल्ह्यातील मालाड, कांदिवली,मागाठाणे, दहिसर, बोरीवली, चारकोप, या सहा मतदार संघामध्ये लांबच्या लांब रांगा दिसून आल्या, अनेक मतदार मतदान न करता माघारी फिरले याचा फटका वंचित बहुजन आघाडी व काँग्रेस व इतर राजकीय पक्षांना बसला यावर अनेक पक्षाच्या नेत्यांचे आरोप पत्यारोप झाले. मुंबई व मुंबई उपनगर अनेक मतदान केंद्रात वयोवृद्ध प्रतिनिधी कर्तव्य बजावत असताना दफ्तर दिरंगाई होताना दिसून आले. विशिष्ट वस्त्या तेथील मतदार केंद्रात एकाच व्यक्तीचे दोनदा तीनदा नाव तपासले जात आहे . मोदी सरकार पराभवाच्या भीतीने निवडणूक आयोगाचा वापर करत आहे. तसेच दप्तर दिरंगाईपणा मत नोंदवताना मतदान केंद्रावर केली जाते असा आरोप शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले.कितीही उशीर झाला तरीही आपण मतदान करावे असे आव्हान ठाकरे यांनी केले.

# मी अगरवाल यांचा जुना कर्मचारी एवढाच संबंध : आमदार टिंगरे

पुणे : माझ्या मतदारसंघात घडलेल्या घटनेबद्दल दु:ख व्यक्त करतो. रात्री तीन वाजून २१ मिनिटांनी माझ्या पी एचा मला फोन आला की मोठा अपघात झाला आहे. त्यानंतर अनेक कार्यकर्ते असल्याचा आणि विशाल अगरवाल यांचा देखील फोन आला की माझ्या मुलाला मारहाण झाली आहे. मी पोलिस स्टेशनला पोहचलो. त्यानंतर पोलीसांनी मला माहिती दिली. त्यानंतर मी पोलिसांना कायद्यानुसार कारवाई करायला सांगितले. मृतांच्या नातेवाईकांशी देखील मी बोललो. मी पब आणि बारच्या विरोधात निहमीच भूमिका घेतली आहे. राजकीय क्षेत्रात प्रवेश करण्याआधी मी अगरवाल यांच्याकडे नोकरी करायचो. एवढाच त्यांचा आणि माझा संबंध आहे. मृतांच्या नातेवाईकांना मी मदत केली. मी पोलिस स्टेशनमधील सी सी टी व्ही फुटेज खुले करण्याची मागणी करतो असल्याचा दावा आमदार सुनील टिंगरे यांनी आज प्रसारमाध्यमांशी बोलताना केला.

पुण्यातील अपघातात मृत झालेल्या युवकांच्या आणि कुटुंबियांच्या दु:खात मी देखील सहभागी आहे. मीही त्याबाबत संवेदनशील आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून काही लोक माझ्या प्रतिमेला डाग लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मृतांच्या नातेवाईकांना मदत केली होती असे आमदार सुनील टिंगरे म्हणाले आहेत. गेल्या दोन दिवसांपासून अपघाताबाबत आरोप झाल्यानंतर सुनील टिंगरेंनी पुण्यात पत्रकार परिषद घेत स्पष्टीकरण दिले आहे. सुनील टिंगरे म्हणाले, रविवारी रात्री ३ वाजून २१ मिनीटांनी रात्री मला माझ्या स्वीय सहाय्यकांचा फोन आला. आपल्या मतदारसंघात कल्याणनगर भागात मोठा अपघात झाला. त्यानंतर मला विशाल अग्रवाल यांचाही फोन आला. त्यांच्याकडून माहिती देण्यात आली. त्यांनी मला सांगितलं की, माझ्या मुलाचा अपघात झाला.


# मांडवी वनपरिक्षेत्र अधिकाऱ्याकडून रोपवनाचा निधी हडप करण्याचा धक्कादायक प्रकार,

किनवट.प्रतिनिधी. (शेख शौकत) उनकेश्वर येथील तीन वर्षांपूर्वी केलेल्या रोपवनातील ९० टक्के रोपे गायब असून मांडवी वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या मनमानी कारभाराने कळस गाठला आहे. मांडवी वनपरिक्षेत्रातील उनकेश्वर परिमंडळा अंतर्गत येत असलेल्या नियतक्षेत्र उनकेश्वर रोपवानाचे नाव उनकेश्वर वनीकरणाचा – भरगच्च कार्यक्रम या योजनेअंतर्गत कक्ष क्रमांक ११४ बी कुप क्रमांक तखख (७) झढ कार्य वर्तुळ खथउ क्षेत्र १० हेक्टर पूर्व पावसाळी कामे सन २०२१-२२ रोपवन घेण्यात आले. सदर रोपवनाला लागवड व पाच वर्षे देखभाल संरक्षणासाठी येणारा लाखो रुपयांचा निधी हा वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या खात्यावर येतो त्याने दिलेल्या निर्देशानुसार संबंधित वनपाल व वनरक्षक हे त्या रोपवना संदर्भातले कामे करून घेतात. रोपवन लावल्यानंतर पहिल्या वर्षी ऑगस्ट पासून नोव्हेंबर पर्यंत तीन वेळा निंदन द्यावे लागते, तीन वेळा मल्चिंग करून त्या रोपा भोवतालची जागा भुसभुशीत करावी लागते ही रोपे हिरवीगार राहण्यासाठी तीन वेळा डीएपी रासायनिक खत द्यावे लागतात. दुसऱ्या वर्षी दोन वेळा निंदन, दोन वेळा मल्चिंग करून त्या गरजेचे आहे. आज एकीकडे ग्लोबल वार्मिंग मुळे वातावरणात मोठा बदल होत असून दरवर्षी उष्णतेचा पारा वाढतच आहे. असे असताना शासनाच्या मूळ उद्देशाला मांडवीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी धाब्यावर ठेवून या रोपवनात रोपच नसताना अशा रोपवनावर निंदन, मल्चिंग, व रासायनिक



खतावर कागदोपत्री लाखो रुपये खर्च दाखवून निधी हडप तर केला नाही ना? अशी शंका येते. असे या रोप नसलेल्या रोपवनावरून दिसून येते. तेव्हा मांडवी वनपरिक्षेत्रात अशाच बोगस रोपवानांची संख्या मोठ्या प्रमाणात असून उपवनसंरक्षक वाभळे यांनी चौकशी करावी तेव्हाच मांडवीचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांचा भ्रष्टाचाराचा बुरखा टराटरा फाटल्याशिवाय राहणार नाही. असे पर्यावरण प्रेमीतून मागणी होत आहे. एकीकडे हिमायतनगर वनपरिक्षेत्रांतर्गत मंगरूळ येथे २०२३ मध्ये वृक्ष लागवड केलेल्या रोपवानात कडक कोणातही तेथील रोपे एका वर्षातच तीन फूट उंचीची हिरवीगार होऊन डोलत आहे. मात्र मांडवी वनपरिक्षेत्रात केलेल्या रोप वनात रोपे का दिसत नाही हा संशोधनाचा विषय आहे. रोपवण्यासाठी जसे अंदाजपत्रक संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी तयार करून मंजूर करून घेतात. अशा या रोपवनासाठी उन्हाळ्यामध्ये रोप वनातील रोपे पाण्याविना वाळू नये यासाठी पाणी देण्यासाठी शासनाकडे आर्थिक तरतूद असतानाही संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी रोपांना पाणी टाकण्यासाठी अंदाजपत्रक मंजूर करावे लागते या अंदाजपत्रकात रोपनातील प्रत्येक एका रोपांना प्रत्येक आठवड्याला वीस लिटर पाणी देण्याची तरतूद आहे. असे असताना संबंधित वनपरिक्षेत्र अधिकारी रोपांना पाणी देण्याची अंदाजपत्रक मंजूरच का करीत नाहीत या मागचा संबंधित वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांचा काय हेतू असतो कारण त्यांना हे रोपे त्या रोपवनात जगवायचेच नसतात कारण हे रोपे जगले तर त्यावर शासनाचा असलेला संपूर्ण खर्च करावा लागतो, म्हणून रोपांना पाण्याची तरतूद असून देखील ते पाण्याचे अंदाजपत्रक वनपरिक्षेत्र अधिकारी मंजूर करून घेत नाही ही वस्तुस्थिती आहे. या सर्व गंभीर प्रकाराची वरिष्ठ स्तरावरून दखल घेऊन चौकशी करून दोशीवर कारवाई करावी अशी मागणी निसर्ग प्रेमी कडून होत आहे. :मांडवी वनविभागाने तीन वर्षांपूर्वी केलेल्या रोपवनात झाडे बेपत्ता? या रोपवनातील जिवंत झाडांसाठी झालेला खर्च हा कोणत्या रोपावर केला याची चौकशी करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

# प्रलंबित कामामुळे प्राचीन श्रीरेणुका मंदिराला धोका?



किनवट . प्रतिनिधी. (शेख शौकत) हिंदुस्तानचे रोडकरी म्हणून प्रसिद्ध असलेले भाररताचे भाग्यविधाते ना. नितिणजी गडकरी यांच्या संकल्पनेतून ४५ कोटी रुपयाचे स्कायवॉक मंजूर झाले असून प्रत्यक्षात कामाला सुरुवात होउन दोन महिने उलटले आहेत. डोंगर पायथ्याशी भले मोठे उत्खनन करून कंपनीने फाउंडेशनच्या डिझानसाठी काम बंद ठेवल्याने लाखो भाविकातुन संताप व्यक्त केला जात आहे. सदरील रेणुका मंदीर टेकडी परीसर भुसभुशीत असल्याने सदरील स्कायवॉकच्या खोदकामामुळे प्राचिन मंदिराला धोका होउ नये म्हणून एरव्ही साध्या फलकाला विरोध करणाऱ्या पुरातत्त्व विभागाने त्यांच्या टिमसह प्रत्यक्ष पाहणी करून या स्कायवॉकच्या ठेकेदाराला या खोदकामाच्या जागी तातडीने बांधकाम करण्यात याव्या अशी मागणी शिवसेना उबाठा गटाचे विधानसभा क्षेत्र प्रमुख जोतिबा खराटे यांनी केली आहे. श्रीरेणुकादेवी संस्थान व पुरातत्त्व विभाग संभाजीनगर याचे अर्थपूर्ण संबंध जुळल्या मुळे तसेच विश्वस्त समितीतील अधिकाऱ्यांचे केवळ बैठकापुरतेच नियंत्रण असल्याने या नाजुक बाबीवर जाणिवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. मंदिर परिसराचे स्ट्रक्चरल ऑडिट करा सिडाम: देवी संस्थानावरील तकलादू बांधकाम व दूकानदाराणी मनमानीने केलेली खोदाई पाहता सदरील रेणुका मंदिराला येत्या पावसाळ्यात धोका झाल्यास जबाबदार कोण या गंभीर प्रश्नावर माकपाचे कॉ. शंकर सिडाम यांनी मंदिर परिसराचे स्ट्रक्चरल ऑडिट करावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा घाटकोपरच्या नुकत्याच झालेल्या फलक दुर्घटनेप्रमाणे मनुष्य बळी गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी विश्वस्त समितीसह संबंधित कंपनीची राहील, असा आरोप देखील सिडाम यांनी केला आहे.

## लातूर मनपाची नालेसफाई मोहीम ६ मोठे व ४० छोट्या नाल्यांची स्वच्छता७ जून पर्यंत पूर्ण होणार स्वच्छतेचे काम



लातूर/ प्रतिनिधी: पावसाळ्याच्या तोंडावर लातूर शहर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागाकडून मान्सूनपूर्व नाले सफाई मोहीम हाती घेण्यात आली आहे.या अंतर्गत आतापर्यंत ६ मोठे व ४० छोट्या नाल्यांची स्वच्छता करण्यात आली असून दिनांक ७ जून पूर्वी स्वच्छतेचे काम पूर्ण केले जाणार आहे.

लातूर शहरात एकूण ११५ नाले आहेत. त्यात ५० मोठ्या व ६५ छोट्या नाल्यांचा समावेश आहे. पावसाळ्याच्या काळात नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दि.२ मे रोजी बैठक घेवून ७ जुनपूर्वी नालेसफाई करण्याच्या सुचना केल्या होत्या.त्यानुसार दि.१० मे पासूनच या नाल्यांची स्वच्छता करण्याची मोहीम पालिकेने हाती घेतली आहे.त्यासाठी २ मोठे जेसीबी ६ छोटे जेसीबी,४ टिप्पर व १० ट्रॅक्टरचा वापर करण्यात येत आहे.गतवर्षी पालिकेने नालेसफाई करून २५० टन घनकचरा संकलित केला होता.यंदाही त्याच पद्धतीने काम सुरू आहे.

शहरातील इस्लामपुरा, गंगाधाम,रिंग रोड,हलकुडे नगर, दीप ज्योती नगर, नांदगाव वेस, साईबाबा नगर,संविधान चौक,कव्हा रोड,कातपुर रोड,नांदेड रोड,सारोळा रोड,बरकत नगर,काझी मोहल्ला, साईधाम रोड,गोपाळ नगर, शंकरपूरम, दयानंद महाविद्यालय, प्रकाश नगर या भागातील नाल्यांची सफाई जेसीबीच्या सहाय्याने करण्यात आली आहे.उर्वरित सर्व लहान मोठ्या नाल्यांची स्वच्छता दि.७ जून पूर्वी करण्यात येणार असल्याची माहिती मनपा उपायुक्त शुभम क्यातमवार यांनी दिली.

# महात्मा बसवेश्वरमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पदवी प्रवेश समितीची बैठक संपन्न

लातूर :- श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील प्राचार्य कक्षामध्ये संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य, शाखा समन्वयक आणि विभाग प्रमुख यांची शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पदवी प्रवेशा संबंधी ऑफ लाइन आणि ऑनलाईन बैठक संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे हे होते तर संस्थेचे सचिव माधवराव पाटील टाकळीकर, संचालक ललिताबाई पांढरे, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, प्रवेश समिती प्रमुख डॉ. बाळासाहेब गोडबोले, वाणिज्य शाखा प्रमुख डॉ. विजयकुमार सोनी, डॉ. शिवप्रसाद डोंगरे, हिन्दी विभाग प्रमुख डॉ. मनोहर चपळे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, राम पाटील आणि श्रीशैल्य पाटील यांची उपस्थिती होती. या बैठकीचे प्रास्ताविक करताना डॉ. बाळासाहेब गोडबोले यांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शासन मान्य तुकड्यातील अनुदानित व विनाअनुदानित विद्यार्थी संख्या आपल्या महाविद्यालयात प्रवेशित करण्यासंबंधी व संस्था पदाधिकारी, प्रभारी प्राचार्य, शाखा समन्वयक आणि विभाग प्रमुखांच्या मार्गदर्शक सूचना घेण्यासाठी या बैठकीचे आयोजन केल्याचे सांगितले. यावेळी मार्गदर्शन करताना संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ साळवे म्हणाले की, आपल्या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पदवी प्रवेशासाठी आपण घेतलेली ऑनलाइन आणि ऑफलाइन बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्याविषयी मी आपल्या सर्वांचे कौतुक आणि अभिनंदन करतो. आपल्या



महाविद्यालयात प्रवेशासाठी आलेला विद्यार्थी व पालकांचा आपण सन्मान करून त्यांना विविध शाखांमध्ये आपल्याला प्रवेश कसा देता येईल याची आपण सर्वतोपरी काळजी घेऊन सर्व तुकड्यांची विद्यार्थी संख्या परिपूर्ण करावी असे सांगून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्याचे अभिनंदन करून महात्मा बसवेश्वर महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्याचे आवाहनही त्यांनी याप्रसंगी केले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश समिती ऑनलाईन आणि ऑफलाइन बैठकीमध्ये श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष, कार्यकारी संचालक आणि सर्व संचालक मंडळातील सदस्य सहभागी होऊन मार्गदर्शन करणे ही बाब अत्यंत अभिमानास्पद आहे असे सांगून महाविद्यालयाची वेबसाईट अद्यावत करणे, सर्व शाखांना सरळ प्रवेश देणे, सर्व शाखांचे एकत्रित माहितीपत्रक, प्रवेशासाठी आलेले विद्यार्थी व पालकाचा सन्मान करणे आदि विविध बाबींची माहिती देऊन पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व तुकड्यांना विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल असे सांगून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२४ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले. या बैठकीला ऑनलाइन डॉ. दिनेश मौने, डॉ. सदाशिव दंदे, डॉ. भास्कर रेड्डी डॉ. सिद्राम डोंगरगे, डॉ. राजकुमार लखादिवे, डॉ. सुजित हंडीबाग यांच्यासह यशपाल ढोरमारे, जगन्नाथ येचेवाड, जलील सय्यद, शुभम बिराजदार, मंगल बिराजदार हे उपस्थित होते.

या बैठकीचे सूत्रसंचालन नामदेव बेंदरगे यांनी केले तर उपस्थितांचे आभार रत्नेश्वर स्वामी यांनी मानले. या बैठकीच्या यशस्वीतेसाठी रंगनाथ लांडगे, संदीप मोरे आणि बालाजी डावकरे यांनी परिश्रम घेतले.

# थकबाकीधारकांकडून १८ लाख वसूल मनपाची थकबाकीधारकावर कार्यवाही सुरुच..

लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताधारकांस थकीत मालमत्ताकराचा भरणा करण्याबाबत वारवांर मागणी बीले,नोटीस सुचना व्याज/शास्तीमध्ये सवलत देऊनही मालमत्ताकराचा भरणा करण्याकडे दुर्लक्ष करणा-या मालमत्ताधारकावर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांच्या आदेशान्वये क्षेत्रीय कार्यालय ए,बी,सी,डी,अंतर्गत येणा-या कार्यक्षेत्रामध्ये थकीत कराच्या वसूलीसाठी आज दिं.२१-०५-२०२४ रोजी वसुली पथकामार्फत मोहीम हाती घेण्यात आली आहे. त्यानुसार क्षेत्रीय कार्यालय ए मध्ये ०३ क्षेत्रीय कार्यालय बी मध्ये ०२ तसेच क्षेत्रीय कार्यालय सी मध्ये ०८ व क्षेत्रीय कार्यालय डी ०३ मध्ये एकुण १६ वाणिज्य आस्थापनावर कार्यवाही करण्यात आली आहे. सदर कार्यवाही करताच यामधील १२ मालमत्ताधारकांनी आपल्याकडील थकीत कर रू,१८,७४,८७७/- एवढी रक्कम वसूल करण्यात आली आहे. या पुढेही थकीत कराच्या वसूलीसाठी थकबाकी मालमत्ताधारकांवर जप्तीची कार्यवाही तिव्र करण्यात येणार असून लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील थकबाकीधारक मालमत्ताधारकांनी आपल्याकडील थकीत मालमत्ताकर व पाणी पट्टी कराचा भरणा करावा व जप्ती सारखी कटू कार्यवाही टाळावी असे आवाहन उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे पाटील यांनी केले आहे.

# हिंगोलीचा लाचखोर मंडळ अधिकारी निलंबित

हिंगोली : तक्रारदाराच्या पत्नीच्या नावे जमिनीचा फेर करून देण्यासाठी २० हजारांची लाच स्वीकारणा-या मंडळ अधिका-याच्या निलंबनाचे आदेश २० मे रोजी जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी काढले आहेत. येहळेगाव सोळंके मंडळाचे मंडळ अधिकारी उत्तम रतनराव डाखुरे यांनी संबंधित तक्रारदाराच्या पत्नीच्या नावे जमिनीचा फेर करून देण्यासाठी लाचेची मागणी केली होती.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून डाखुरे यांना हिंगोली येथे २० हजारांची लाच घेताना पकडले. याबाबत हिंगोली शहर पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ९ मे २०२४ रोजी त्यांना या प्रकरणात अटक करण्यात आली होती. याबाबतचा अहवाल जिल्हाधिका-यांकडे सादर झाल्यानंतर त्यांनी डाखुरे यांच्या निलंबनाचे आदेश काढले आहेत. प्रशासनाची प्रतिमा मलीन झाल्याचा ठपका ठेवत ही कारवाई केली. तर निलंबनाच्या काळात तहसील कार्यालय वसमत येथे मुख्यालय राहील, असेही आदेशात म्हटले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागासही तसे कळविण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE